## निशाणी १३२ वरील आदेश.

(दि. २७/०२/२०२४ रोजी घोषित)

दोन्ही बाजुंच्या सुविद्य विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे, म्हणण्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा कु. राही विश्वंबर सोनोने हिने अज्ञान पालनकर्ता म्हणून रमेश इंद्रभान भरक्षे यांच्या मार्फत दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये कु. राही विश्वंबर सोनोने हिचे असे म्हणणे आहे की ती आता सज्ञान झालेली असल्याने तिला प्रस्तुत प्रकरणामध्ये तिचा पुरावा देण्याची परवानगी देण्यात यावी. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३२ नियम १२ चे वाचन केले असता ही बाब स्पष्ट आहे की अल्पवयीन वादीला तो सज्ञान झाल्यावर सदर दावा पुढे चालवायचा की नाही हे ठरविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याकरिताची सर्व तरतुद नियम १२ मध्ये नमुद करण्यात आली आहे. प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल करताना कु. राही विश्वंबर सोनोने ही सज्ञान झालेली नाही असा आक्षेप कोणीही घेतलेला नाही. अशा परिस्थितीत वादीला आदेश ३२ नियम १२ प्रमाणे उचित कार्यवाही करण्याचा संपुर्ण अधिकार आहे. एकदा कु. राही विश्वंबर सोनोने ही स्वतः वादी झाल्यास तिला तिच्या इच्छे नुसार पुरावा देण्याचा देखील अधिकार प्राप्त होणार आहे. मात्र त्याकरिता आधी नियम १२ प्रमाणे कार्यवाही होणे गरजेचे आहे.

२. वरील सर्व विवेचनावरुन माझे असे मत आहे की वादीने आधी नियम १२ प्रमाणे कार्यवाही करायची की नाही हे ठरवावे व त्यानंतर तिला तिचा पुरावा देता येणार आहे. त्या अनुषंगे प्रस्तुत अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

स्वा/-

अकोट
दिनांक २७.०२.२०२४

भानुप्रताप चौहान
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
अकोट

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Rajesh U. Bhad |
| Name of the Court | : Jt.Civil Judge J.D. Akot |
| Date of Judgment | : 27-02-2024 |
| Signed by Presiding Officer on | : 27-02-2024 |
| Judgment uploaded on | : 29-02-2024 |